नि.फौ.ख.क्र. ८६/२०१६
सरकार –वि– तानाजी जुनारे

**<u>निशाणी क्र. ३४</u>**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ यांची जबानी.

देवाची शपथ खरे सांगतो की,

माझे नांव – रामदास पुरुषोत्तम वाढे

माझे वय – ५४ वर्षे,

धंदा – नोकरी.

राहणार – C.C.T.N.S. Buldana, ता. बुजडाणा, जि. बुलडाणा.

– – – – –

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री.बी.व्ही.वाहूरवाघ यांच्यामार्फत</u>**

दिनांक ११/०६/२०१६ रोजी मी बोराखेडी पोलीस ठाणे येथे कार्यरत होतो. त्या दिवशी माझ्याकडे गुन्हा क्र. ११२/२०१६ चा तपास देण्यात आला होता. गुन्हा दिनांक १०/०६/२०१६ रोजी निष्पन्न झाला होता. आरोपीने पाणी चोरल्याबाबत फिर्याद देण्यात आली होती. त्यानंतर मी निशाणी क्र. २० प्रमाणे घटनास्थळ पंचनामा केला. तेव्हा दोन पंच, ग्राम पंचायत सदस्य, मजुर व फोटोग्राफर माझ्यासोबत होते. पंचनाम्याच्या वेळेस फोटो काढण्यात आले होते तसेच त्या प्रक्रियेचे चलचित्रण साक्षीदार क्र. ३ याने केले होते. प्रक्रियेनंतर साक्षीदार क्रमांक ३ याने माला घटनास्थळाचे फोटो व चलचित्रणबाबत सि.डी. दिली होती. वस्तु **'अ'** ते वस्तु **'फ'** वरिल फोटो तेच असुन वस्तु ब वरिल डि.व्ही.डी. तिच आहे.

०२. सदरचे फोटो आणि डि.व्ही.डी. संदर्भात मी पुरावा कायदा कलम ६५ ब नुसार प्रमाणपत्र हजर करण्यात तयार आहे. घटनास्थळ हे तांदुळवाडी

शिवारात गट क्रमांक ८८ मध्ये होते. ती जमीन आरोपीचे वडील सुपडा जुनारे यांच्या मालकीची होती. जागेवर असे दिसुन आले होते की, ग्राम पंचायतीने सहा इंची पाईपद्वारे नळगंगा धरणातुन गावासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती. परंतु, आरोपीने त्याच्या शेतात सदरच्या सहा इंची पाईपला प्रत्येकी पाऊन इंचीचे दोन पाईप लावुन त्याच्या शेतात पिकांना पाणी देण्याची व्यवस्था केली होती. आरोपी सदरचे पाणी ठिबकद्वारे शेतात देत होता. आरोपीने पाऊण इंचीचे पाईप सॅडलच्या सहाय्याने जोडले होते. तपासात मी सदरचे सॅडल, पाईप व ठिबकच्या नळ्या जप्त केल्या होत्या. त्याबाबत मी जप्ती पंचनामा केला होता. अभिलेखात तो निशाणी क्र. २१ वर आहे. त्यानंतर मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सदरच्या जमीनीबाबत मी सुपडा जुनारे यांच्या नावाचा ७/१२ उतारा प्राप्त केला. तो **<u>निशाणी क्र. ३५</u>** वर आहे. तपासात असे निष्पन्न झाले की, आरोपीने ग्राम पंचायतीच्या पिण्याचे पाणी चोरले होते.

०३. त्यानंतर मी आरोपीला अटक केली. तपास पूर्ण करुन आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्याने मी त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी आज न्यायालयासमोर हजर नाही.

## <u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पि.जी. परवाल यांच्यामार्फत</u>

०४. हे म्हणणे खरे आहे की, कलम ६५ ब चे प्रमाणपत्र दोषारोपपत्रात दाखल करणे अपेक्षीत असते. कॅमे–यावरुन चलचित्र डि.व्ही.डी. मध्ये कोणी टाकले होते, हे मी सांगु शकत नाही. मी साक्षीदार क्र. ३ याच्याकडुन आठ फोटो मिळविले होते. त्या व्यतिरीक्त मी त्याच्याकडुन कोणतेही फोटो घेतले नव्हते. वस्तु अ ते फ वरिल फोटो मध्ये फोटो काढल्याची तारीख व फोटो काढल्याचे ठिकाण नमुद नाही. त्याबाबत मी देखील दोषारोपपत्रात उल्लेख केलेला नाही. निशाणी क्र.

३४ वरिल प्रमाणपत्र मी दिनांक २३/११/२०२१ रोजी प्राप्त केले आहे. सध्या मी बुलाडाणा येथे कार्यरत आहे. सदरचे प्रमाणपत्र मी सदर दिवशी दुपारी १२.०० ते १२.३० वाजेच्या सुमारास मिळविले आहे. आरोपीने किती पाणी चोरले याबाबत कोणत्याही अभियंत्याने प्रमाणपत्र दिले नव्हते. त्याबाबत मी स्वतंत्र चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत मी साक्षीदारांनी सांगितल्याप्रमाणे कथन करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाची शेतजमीन आरोपीच्या मालकीची नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील जमीन सुपडा जुनारे यांच्या मालकीची असुन देखील केवळ सरपंच व ग्रामसेवक यांच्या सांगण्यावरुन मी आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले आहे.

०५. हे म्हणणे खरे आहे की, जप्त वस्तु बाजारात सहज उपलब्ध असतात. हे म्हणणे खरे नाही की, वादातील जमीन आरोपीची नसुन त्या जमीनीतुन काहिही जप्त झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जागेवरुन पाईप इत्यादी जप्त केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पुरावा नसतांना मी आरोपीविरुध्द दोषारोपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
**(म.बा.आसिजा)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नांदुरा.

नांदुरा.
दिनांक – २८/१२/२०२१.

– – – – –